# ठेवींना विमा संरक्षण



भारतातील बँकींग व्यवसायाला मोठा इतिहास आहे. बँकिंगच्या माध्यमातून होणाऱ्या विकासाला सुध्दा मोठी परंपरा आहे. सन १९४७ पासून बँकींग या पर्वाला आर्थिक क्रांतीचे साधन म्हणून चांगला नावलौकीक प्राप्त झालेला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५ साली झाली. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर देशातील १४ बँकांचे सन १९६९ साली राष्ट्रीयकरण झाले. तद्नंतर सन १९८० साली ६ कमर्शियल बँकांचे राष्ट्रीयकरण झाले. बँकींग या पर्वामुळे देशातील जनतेसाठी विकासाचा मार्ग खुला झाला. ज्यामध्ये प्रामुख्याने आपल्याकडे उपलब्ध असलेली पुंजी सुरक्षीत ठिकाणी गुंतविणे व ज्यांना आपल्या विकासासाठी माफक व परवडेल अशा दराने कर्जाची आवश्यकता आहे हा हेतू पुर्ण करण्यासाठी बँका काम करू लागल्या. त्यामुळे भारतातील जनतेला आपल्या हक्काचे व आपले असे आर्थिक केंद्र म्हणून बँकांकडे बघण्याचा दृष्टीकोन दिवसेंदिवस दृढहोत गेला. त्याचाच सुपरिणाम म्हणून जनता आपल्याकडील पैसे ठेव म्हणून बँकांमध्ये ठेवू लागली. एकंदरीत जनतेने स्वत:चे आर्थिक केंद्र उभे राहिल्यामुळे भारत देशाला सुधारणावादी देश म्हणून जगभर प्रसिध्दी मिळाली.

दरम्यानच्या काळात ही बँकीग व्यवस्था ज्या वेगाने शेवटच्या माणसापर्यंत लार्भार्थीत होण्यासाठी पोहचणे आवश्यक होते, ते मात्र दुर्दैवाने झाले नाही. म्हणून केंद्र सरकारने त्या त्या राज्याला जनतेसाठी जनतेचा बँकींगमध्ये सहभाग व्हावा, म्हणून आपापली दालने उघडण्यास प्रोत्साहित केले. राज्या - राज्यात त्या त्या राज्याचे सहकार कायदे अस्तित्वात आले.महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० हा लोकाभिमुख सहकारी कायदा अस्तित्वात आला. ज्यामध्ये प्रामुख्याने बँकींग हा मुलभुत विचार विस्तारीत करण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रात बँकांबरोबर सहकारी पतसंस्थाच्या माध्यमातून मोठ्या वेगाने व मोठ्या प्रमाणात छोट्या माणसांपर्यंत पोहचण्यास पुरक असे वातावरण तयार झाले. आज महाराष्ट्र राज्यात ५५० च्या दरम्यान नागरी सहकारी बँका,

३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १ राज्य सहकारी बँक, एक लाखाच्यावर विविध कार्यकारी सहकारी संस्था, १८ हजारांच्यावर नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आणि ७ हजारांच्यावर पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्था, ह्या सर्वांनी महाराष्ट्र राज्याच्या १२ कोटी लोकसंख्येपैकी ५ ते ६ कोटी जनतेत अव्वल स्थान मिळविले. आणि ह्यामुळेच बँकांबरोबर सहकारी कायद्याच्या माध्यमातून उभे राहिलेल्या आर्थिक परिवर्तन युगामध्ये क्रांती करणाऱ्या पतसंस्था नावारूपाला आल्या.

संपूर्ण देशाची आर्थिक परिस्थिती व महाराष्ट्र राज्याची आर्थिक परिस्थिती याची तुलना केली असता, खऱ्या अर्थाने सहकारी पतसंस्थांनी देशाच्या आर्थिक धोरणाला लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी फार मोठे योगदान दिले. सर्व साधारणपणे प्रत्येक १८ वर्षांपुढील नागरिक या सहकारी पतसंस्थेत प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या सहभागी झाला, त्यामुळे महाराष्ट्र राज्याची आर्थिक क्रांती होण्यासाठी पतसंस्थांचा चांगला हातभार लागला. राज्यातील विविध कारखानदारी, छोटे - मोठे उद्योग धंदे, सर्वीस इंडस्ट्रीज इत्यादींच्या उभारणीमध्ये सहकारी पतसंस्थांचा मोठा सहभाग तयार होत गेला. त्यामुळे आपोआप सर्वसामान्य लोक पतसंस्थांमध्ये बँकींगचा मुळ हेतू उपभोगू लागले. सहजपणे कर्ज उपलब्ध होवू लागले. आणि ह्या विश्वासावर जनतेने पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात ठेवी जमा करण्यास सुरवात केली. व अनुषंगाने सहजपणे अडचणीच्या काळात कर्ज सुध्दा उपलब्ध होवू लागले. आणि हेच महाराष्ट्रातील सहकाराच्या यशस्वतीचे मुळ गमक आहे.

दुर्दैवाने सरकारला हा विषय आत्मविश्वासाने अंगिकारता आला नाही. डिपॉझीट इन्शुरन्स कारपोरेशन ॲक्ट , १९६१ नुसार बँकांमध्ये कुठल्याही प्रकारची ठेव ठेवणाऱ्यास ती बँक अडचणीत किंवा दिवाळखोरीत निघाल्यास ठेवीदारास रूपये एक लाखापर्यंत संरक्षण मिळाले. म्हणजेच डिपॉझीट इन्शुरन्स कारपोरेशनकडून रूपये एक लाख परत मिळवण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला. परंतु हेच संरक्षण पतसंस्थांना मात्र देण्यासाठी सरकारने साधा विचारसुध्दा केला नाही. हा लोकशाहीतील समानतेवर आरूढझालेल्या राजव्यवस्थेचा पराजय आहे हे दिवसेंदिवस जनतेच्या लक्षात आले. आणि

हीच बाब आम्ही आजच्या या अग्रलेखातून सहकारी कार्यकर्ते व आम जनतेसमोर या विषयाला विस्तृतपणे चालना मिळण्यासाठी व त्यातून मार्ग निघावा ह्या हेतूने शब्दांकित करीत आहोत.

बँका व पतसंस्था या दोन्ही सेक्टरचे काम व व्याप्ती एक सारखीच आहे. दोघेही ठेवी स्विकारतात व कर्जे वाटतात. दोघेही ठेवींवर व्याज देतात व वाटलेली कर्जे कायद्याने वसुलही करतात. दोघेही नक्त नफ्यातून सामाजिक बांधीलकीचेही काम करतात. दोघांमुळेही लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम झालेले आहे. दोघेही संस्थांचे आर्थिक स्थैर्य जपून अल्प व्याजदरात सभासदांना कर्ज देतात, दोघेही कायदेशीर गुंतवणुक करतात. दोघेही एनपीए ची तरतुद करतात. दोघेही सीडी रेषोचे पालन करतात. दोघेही ढोबळ नफा व नक्त नफा काढताना एकाच प्रणालीचा वापर करतात. दोघेही राखीव निधी व इतर तरतुदीसाठी सारखाच मापदंड लावतात. दोघांनाही एकच सहकार कायदा लागू आहे. फरक फक्त एकच आहे की, **बँकांना ठेवीदाराला स्वतःचे धनादेश उपलब्ध करून देण्याची कायदेशीर उपलब्धतता असून बँकांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचेसुध्दा अतिरिक्त बंधन आहे.** एवढेच केवळ पतसंस्थांना लागू नाही.

अशा परिस्थितीत पतसंस्थांमध्ये ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांच्या ठेवीनां बँकांएवढेच ठेव संरक्षण देण्यासाठी डिपॉझीट इन्शुरन्स कारपोरेशनचा नवीन कायदा सहकारी पतसंस्थांसाठी बनविणे आवश्यक आहे. हे काम सरकारने नजीकच्या भविष्य काळात पतसंस्थांसाठी करण्याची मोठी गरज आहे. कारण समानतेवर पतसंस्थांचाही विश्वास आहे. बँकांप्रमाणेच पतसंस्थांमधील ठेवींना रूपये एक लाखापर्यंत कायद्याने संरक्षण देण्याची हीच वेळ आहे. अन्यथा भविष्यकाळ कोणालाही माफ करणार नाही.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**